## 16 . जनसंवाद

**विभागप्रमुख : मोईज् मन्नान हक**
**बी. कॉम., एम. बी. ए.**
**बी. एम. सी. एम. एम. सी.**
**ए. डी. जे. (जर्मनी), ए. एफ.**
**पी. फेलो (यू एस ए)**

**अधिव्याख्याता : डॉ. धर्मेश व्ही. धावणकर**
**पी.एच.डी., एम.एम.सी., एम.ए. (ऍड. पी. आर.),**
**एम.ए. (ब्रॉडकास्ट जर्नलिस्म) ,**
**एम.बी.ए. (कम्युनिकेशन) ,**
**पी.जी. डिप्लोमा (व्हिडिया प्रोग्रामिंग)**

**अंशदानात्मक शिक्षक : 15**

**विद्यार्थी व परीक्षाचे निकाल**

| | प्रवेशित | | परीक्षार्थी | | उत्तीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यार्थी | विद्यार्थिनी | विद्याथी | विद्यार्थिनी | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
| भाग–1 | 18 | 14 | 17 | 11 | 10 | 6 |

### प्रशिक्षण कार्यक्रम/प्रकल्प

1. दिनांक 5 / 08 / 2010 जनसंवाद विभागात 'गांधीजींचे मौलिक तत्व आजच्या काळानुरुप' या चर्चा सत्रात सामाजिक कार्यकर्ता, अंतरष्टीय हिन्दी विश्वविद्यालय वर्धा, माजी प्र–कुलगुरु श्री. अशित सिन्हा, गांधींयन स्कॉलर, माजी सिनेट सदस्य प्रा. प्रशांत कडु यांनी गांधीजींच्या तत्वज्ञानावर मोलाचे विचार विद्यार्थ्यांन पुढे ठेवले. जनसंवाद विभाग प्रमुख, रातुम, नागपूर श्री. मोईज मन्नान हक यांनी सर्वांचे आभार मानले.

2. दिनांक 18 / 10 / 2010 ते 17 / 11 / 2010 विद्यार्थ्यांचे 'इन्टरशिप' कार्यक्रम.

जनसंवाद विभागात शिक्षण घेत असलेले बी. जे. आणि पी.जी.डी.व्ही.पी चे विद्यार्थ्यांनी विविध मीडिया संस्थेला भेट देउन कश्या प्रकारे संस्था आपले कार्य करतात याचे शिक्षण घेतले. या मध्ये पी.जी.डी.व्ही.पी च्या विद्यार्थ्यांनी दूरदर्शन, स्टार न्यूज, लोकल चॅनल युसीएन, मध्ये तज्ञ व्यक्तिनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले. अभ्यासाच्या दृष्टीकोणातुन उपयोगी होते.

बी. जे. च्या विद्यार्थ्यांनी हितवाद, सकाळ, लोकमत, पुण्यनगरी, दैनिक 1857, युसीएन, जनसंपर्क वेर्स्टन कोलफिल्ड लिमिटेड, जनसंपर्क महाराष्ट शासन व माहिती, नागपूर येथे तज्ञ व्यक्तिनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले. ज्या मध्ये भाषा अनुवाद, बातमीचे पुर्णलेखन, प्रेस रीलिज, जे अभ्यासाच्या उपयोगी होते.

3. दिनांक 5 / 1 / 2011 ते 8 / 1 / 2011 'विडीओ एडीटींग' या कार्यशाळेत जनसंवाद विभागातील पी.जी.डी.व्ही.पी. च्या विद्यार्थ्यांनी, स्टुडियो तज्ञ, सी.एन.बी.सी. टी.वी.–18, नवी दिल्ली, श्री. मयुर कालर्सपे यांनी स्टुडियो सेट अप, लाईट, कॅमेराचे स्थान, कम्पोंजींग, माईक्रोफोन, ई.एन.जी चा वापर, व्हिडीओ एडिटींग, ग्राफिक्स, इफेक्ट, आवाज, स्क्रिप्ट लिखान याचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले.

4. दिनांक 17 / 2 / 2011, 22 / 2 / 2011 व 9 / 3 / 2011 'डाक्युमेंटी मेकिंग' या कार्यशाळे मध्ये 'व्हेटर्न टीवी' संपादक व निर्माती श्रीमती बी. कल्याणी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

5. दिनांक 28 / 3 / 2011, जनसंवाद विभागातील विद्यार्थ्यांचे 'कॅम्पस बुलेटीन' राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास एस. सपकाल याच्या हस्ते 'कॅम्पस बुलेटीन' चे अनावरण करण्यात आले. 'कॅम्पस बुलेटीन' हे आठ पानाचे टेबोलाईड बुलेटीन असुन विद्यार्थ्यांनचे लेख आणि वर्ष भरात जनसंवाद विभागात झालेल्या कार्यक्रमाचा आढावा या मध्ये समावेश करण्यात आला. जनसंवाद विभाग, रातुम, विभाग प्रमुख श्री मोईज मन्नान हक, डॉ. महेशकुमार यान्की, श्री. प्रशांत मोहिते आणि विद्यापीठ अधिकारी उपस्थित होते.

## परिसंवाद / कार्यशाळा

1. दिनांक 2 / 8 / 2010 ते 7 / 8 / 2010 'करियर जनसंवाद माध्यम चर्चा सत्र' या कार्यक्रमात उप संपादक हिन्दुस्थान टाईम्सचे श्री. प्रदिप कुमार मित्रा, संपादक दैनिक भास्कर, श्री. प्रकाश दुबे, यांनी प्रामुख्याने विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले.

जनसंवाद विभाग प्रमुख श्री. मोईज मन्नान हक आणि ब्युरो चिफ, युएनआय, श्री. आनन्द भिसे, यांनी 'जनसंवाद माध्यमाची आवशकता' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'द हितवाद' चे वरिष्ठ रिपोर्टर श्री. नीरज चिंचखेडे यांनी 'विडीओ प्रोग्रामिंग' या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली.

'नौकरी—जन सम्पर्क माध्यमात' या विषयावर वेर्स्टन कोल्ड फिल्डचे पीआरओ, श्री. एस. पी. सिंह यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले.

'जाहिरात क्षेत्रातील करियर' या विषयावर प्रॉफीट ॲडव्हरटाईजरची मुख्य अधिकारी, श्रीमती मनिषा बोरटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'इलेक्टानिक माध्यमात करियर' या विषयावर स्टार न्युजची ब्युरों चिफ मिस. सरिता कौशिक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले.

'मुद्रण माध्यमात करियर' या विषयावर ब्युरों चिफ, डी.एन.ए. चे श्री. जयदीप हरिडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'जनसंवाद—पलिकडिल रिपोर्ताज' या विषयावर वरीष्ठ पत्रकार, माजी संपादक फेमिना पत्रिका, मुंबई श्रीमती. सत्या सरण, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले.

2. दिनांक 29 / 9 / 2010 जनसंवाद विभागात 'अयोध्या—पुढचा मार्ग' या गंभिर विषयावर चर्चा सत्राचे आयोजन केले गेले. या पॅनल मध्ये इंडिया पीस सेन्टर, नागपुर चे श्री. जॉन चेलीदुरई, तरुण भारतचे माजी संपादक, वरीष्ठ पत्रकार श्री. सुधीर पाठक, राज्य शास्त्र विभाग प्रमुख, रातुम, डॉ. मोहन काशिकर, ॲड. डॉ. वसंत खापर्डे, सूत्र संचालन द हितवाद चे वरिष्ठ रिपोर्टर श्री. नीरज चींचखेडे यांनी केले. या कार्यक्रमात मोठया संखेने विद्यार्थ्यांची उपस्थीति होती.

3. दिनांक 27 / 10 / 2010 'दक्षता आयोग आणि मास मीडिया' दक्षता आयोग आणि पावर ग्रीड कॉरपोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, नारी रिंग रोड, नागपूर येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यकारी मुख्य अधिकारी, पावर ग्रीड—1, श्री. डी. के. व्हेलचा, विभाग प्रमुख, जनसंवाद विभाग, रातुम, नागपूर श्री. मोईज मन्नान हक, पावर ग्रीड कॉरपोरेशनचे मुख्य अधिकारी श्री. के. के. गुप्ता, दक्षता आयोगाचे मुख्य अधिकारी श्री. बी. एम. पटनाईक उपस्थित होते.

पहिल्या सत्रात पोलिस अधीक्षक, सी.बी.आय. श्री. थॉमस जॉन, लोकसत्ता चे संपादक श्री. प्रवीण बरदापुरकर, पावर ग्रीड चे अधिकारी श्री. ए. के. सिन्हा उपस्थित होते.

दुस—या सत्रात पोलिस अधीक्षक, भ्रष्टाचार निरोधक ब्युरो प्रमुख, नागपूर, श्री. संदीप दिवान, द हितवाद चे शहर संपादक श्री. राहुल पांडे, पावर ग्रीड—2 चे मुख्य अधिकारी, श्री. जेबाकर जेम्स, विभाग प्रमुख, जनसंवाद विभाग, रातुम, नागपूर श्री. मोईज मन्नान हक, राष्ट संत तुकडोजी महाराज, सलग्न असलेले जनसंवाद विभागातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

4. दिनांक 23 / 11 / 2010 'मीडिया माईन्डप्रींट' या चर्चा सत्रात प्रमुख वक्ते कार्यकारी अधिकारी, आई.एस.बी.ॲन्ड एम. स्कुल ऑफ कम्युनिकेशन, प्रा. उज्जवल चौधरी, जनसंवाद विभाग प्रमुख, रातुम, विद्यापीठ नागपूर श्री. मोइज मन्नान हक, सिनेमा निर्माता श्री. शाम धर्मधीकारी, टी.वी. फेम श्री. एन.सी. शर्मा, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

5. दिनांक 5 / 2 / 2011 ते 12 / 2 / 2011 'टीवी प्रोडक्शन' जनसंवाद विभागात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. स्टार प्लस चे कॅमेरा तज्ञ श्री. विनोद पंडोले यांनी बी.जे. व पी.जी.डी.व्ही.पी. च्या विद्यार्थ्यांना आपल्या आगळयावेगळया

विचाराने प्रभावित करुन, नविन कलात्मक विचाराने, शब्द रचना, फोटो, कॅमेराच्या विविध कोणातुन कश्या प्रकारे चित्रिकरण करु शकतो याचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले.

संपादक व दिगदर्शक श्रीमती बी. कल्याणी ज्यात 250 चित्रीकरण केले. जनसंचार व माहिती अधिकारी वन विभाग श्री. कमलाकर धमगे, जनसंवाद विभाग, विभाग प्रमुख, रातुम नागपूर श्री. मोईज मन्नान हक, जनसंवाद विभागत संलग्न श्री निरज चिंचखेडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

## अभ्यास दौरे

1. दिनांक 9 / 10 / 2010 'शांति सप्ताह' जनसंवाद विभागातील विद्यार्थ्यींनी सेवाग्राम आश्रम वर्धा, शैक्षणिक भेट दिली. शांति स्तुप, विनोबा भावेंचे तत्वज्ञानाबद्ल माहिती, तसेच बापु कुटीला भेट देण्यात आली.

2. दिनांक 14 / 12 / 2010 जनसंवाद विभागातील विद्यार्थ्यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात विधान भवन ला भेट देउन महाराष्ट राज्याचे विधानसभा आणि विधान परिषद मधल्या चर्चा प्रत्यक्ष पाहिल्या. या अगोदर, विधीमंडळाच्या बातम्या कश्याप्रकारे तयार करतात याची माहिती अनुभवी पत्रकार प्रा. अरुण फणशीकर यांनी विद्यार्थ्यांना दिली.

3. दिनांक 17 / 1 / 2011 रेडिओ मिर्ची, युसीएन भेट– जनसंवाद विभागातील विद्यार्थ्यांनी या जन माध्यमाच्या माध्यमाला भेट दिली. कार्यक्रम अधिकारी आणि रेडिओ जॉकी श्री. सालन गणेश यांनी कश्या प्रकारे कार्यक्रमाचे आयोजन आणि संप्रेशन केल्या जाते याचे मोलाचे मार्गदर्शन दिले. श्री. पुनीत मिश्रा यांनी युसीएन मधील न्युज रुम, कनटोल रुम, कॅमेरा, लाईट, व्हिडीओ एडिटींग, साउन्ड मिक्सिंग कश्या प्रकारे केल्या जाते याचे मोलाचे मार्गदर्शन दिले.

4. दिनांक 5 / 3 / 2011, 'पीआर विश्व आणि त्यातील जाहिरात' जनसंवाद विभागातील विद्यार्थ्यांनी या 'शेल्स ॲडव्हरटाईजींग' चे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. संजय अरोरा यांनी विज्ञापन क्षेत्रामध्ये कश्या प्रकारे आकर्षित करणा–या संधी उपलब्ध आहेत याची माहिती जनसंवाद विभागातील विद्यार्थ्यांना करुन दिली.

5. दिनांक 5 / 3 / 2011, मध्य भारतातील सगळयात अग्रेसर इंग्रजी दैनिक 'द हितवाद' ला जनसंवाद विभागातील विद्यार्थ्यांनी भेट दिली. वरिष्ठ उप संपादक श्री. सुभाष देवपुजारी यांनी मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना आवर्जुन दिले. ज्या मध्ये संपादकीय विभाग, मार्केटिंग विभाग, बीट, न्युज रुम याची माहिती देण्यात आली.

6. दिनांक 11 / 3 / 2011, जनसंवाद विभागातील विद्यार्थ्यांनी 'द हितवाद' च्या प्रिन्टींग प्रेस, वाडी एम.आय.डीसी अमरावती रोड नागपूर, ला जाउन पेपर कसा छापला जातो याची माहिती प्रेस अधिकारी श्री. एस. डी. सररोडे यांनी, प्लेट कश्या बनवल्या जातात, रंगांचा प्रयोग कश्या प्रकारे केल्या जातो, पेपर कश्या प्रकारे प्रिन्ट होउन बाहेर पडतो, कापल्या जातो, फोल्ड केल्या जातो, मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले.

## व्याख्यान

1. दिनांक 13 / 8 / 2010 जनसंवाद विभागात '26/11 मुंबई दहशतवादी हल्ला' या विषयावर वरीष्ठ पत्रकार श्री. योगेश पवार, मुबई आणि अमेरिकन सेंटर मीडियाचे जनसंपर्क अधिकारी, श्री केतन वैद्य यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले.

2. दिनांक 6 / 9 / 2010 जनसंवाद विभागात 'नागपुर महानगर पालिका' या विषयावर उप महापोर श्री. शेखर सावरबांधे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले.

3. दिनांक 14 / 9 / 2010 जनसंवाद विभागात 'बिहार निवडणुक' या विषयावर वरीष्ठ पत्रकार, शहर संपादक, मराठी लोकमतचे श्री. यदु जोशी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले.

4. दिनांक 8 / 10 / 2010 जनसंवाद विभागात 'बीजेपी–अटल बिहारी वाजपेयी ते नितिन गडकरी' या चर्चा सत्रात राजस्थान पत्रिकाचे, खास बातमीदार श्री. समिर चौघनकर यांनी विद्यार्थ्यांन पुढे आपले विचार मांडले.

5. दिनांक 13 / 12 / 2010 'जनसंवाद माध्यमातुन शिक्षण आणि करियर' या चर्चा सत्रात विभाग प्रमुख जनसंवाद विभाग, बाबा साहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, प्रा. व्ही. एल. दारुरकर ज्यांचा पत्रकारितेच्या क्षेत्रात 30 वर्षाचा दांडगा अभ्यास असुन पत्रकारितेच्या क्षेत्रात करियर कसे निर्माण करावे याचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले.

6. दिनांक 20 / 12 / 2010 कायदेमंडळ/विधिमंडळाचे काम काज कश्या प्रकारे होते याची माहिती राजनीति शास्त्राचे तज्ञ प्रा. किशोर महाबळ, यांनी कायदेमंडळ सरंचना, अधिकार, कामे, जवाबदारी, शुन्य काळ, प्रश्न काळ, वादविवाद, संवादा बद्ल विद्यार्थ्यांना वितृत माहिती दिल्या गेली.

7. दिनांक 27 / 12 / 2010 'फोटो जर्नलिजम' चर्चा सत्रात, मध्य भारतातील पद्मश्री प्राप्त श्री. वामण ठाकरे यांनी फोटो पत्रकारित आणि डिजीटल फोटोग्राफी बद्ल माहिती विद्यार्थ्यांना दिली.

8. दिनांक 1 / 1 / 2011 'हाउस जर्नल' कश्या प्रकारे जनसंपर्क माध्यमातुन संवाद साधला जातो, याचे अनुसंधान अधिकारी, आरोग्य मंत्रालय, नवी दिल्ली, श्री. मेहर आलम खान, पुराणवस्तु संशोधन विषयक डॉ. जी.एस. ख्वाजा यांनी जनसंवाद माध्यमातुन 'संवाद' या चर्चा सत्रातुन विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले.

9. दिनांक 19 / 1 / 2011 'इनव्हेस्टीगेटींव जर्नलीजम' या चर्चा सत्रात पत्रकारितेच्या क्षेत्रात काळजीपूर्वक तपास कश्या प्रकारे लावल्या जातो, मीडिया तज्ञ डॉ. फ्रांसीस अरकाल यांनी समाजात कार्य करत असतांना जवाबदारीने आपली भूमिका कशी पार पाडावी याचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले.

## <u>सांस्कृतिक कार्यक्रम</u>

1. दिनांक 7 / 9 / 2010 जनसंवाद विभागात 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य शिक्षकांपुढे सादर केल.

## <u>माजी विद्यार्थी संघ</u>

1. दिनांक 11 / 12 / 2010 'संपर्क' द ॲल्युमनी मीट या भव्य कार्यक्रमात सलग दुस–या वर्षी मोठा प्रतिसाद मिळाला. जनसंवाद विभागातील माजी विद्यार्थी जे विविध क्षेत्रा मध्ये मोठया पदावर कार्यरत असुन जनसंवाद, शासन, सामाजिक क्षेत्र, राजनीति क्षेत्रात आपले कार्य जवाबदारीने पार पाडत आहेत, या कार्यक्रमात जुन्या आठवणी उफाळुन आल्यात. लिम्का पुस्तकात आपले नाव नोदवणारे श्री. दिपक संत यांनी आपल्या देश विदेशातुन गोळा केलेल्या वर्तमान पत्रांची प्रदर्शनी जनसंवाद विभागात लावली होती. तसेच फोटो, पत्रकारितेच्या क्षेत्रात मिळालेले अवॉर्ड, प्राईज, प्रमाण प्रत्र ठेवण्यात आले होते.

## <u>परिषदांमध्ये शिक्षकांचे सहभाग</u>

1. डॉ. धर्मेश धावणकर : आतंरराष्टीय – 5 राष्टीय– 5

## <u>ग्रंथालयातील पुस्तके व नियतकालिके</u>

| | | | संख्या | वाढ |
|---|---|---|---|---|
| 1) | पुस्तकांची एकूण संख्या | 1066 | 1095 | 29 |
| 2) | भारतीय नियतकालिकांची संख्या | 01 | – | – |
| 3) | आंतरराष्ट्रीय नियतकालिकांची संख्या | 01 | – | – |
| 4) | ग्रंथालयात येणारी वृत्तपत्रे | 05 | 26 | 21 |
| 5. | शिष्यवृत्ती | 07 | | |

## <u>अहवाल वर्षात खरेदी केलेले उपकरण</u>

1. मल्टी मीडिया प्रोजक्टर – 02.
2. संगणक – 01.
3. झेरॉक्स मशीन – 01.